# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ 8055 /२०२३ पुणे दिनांक - 4 / 11 /२०२३

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, हडपसर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी पार्किंगचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**डेक्कन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **कमला नेहरू पार्क ते पीवायसी हिंदु जिमखाना रोडवरील पवार बंगला ते आनंद भवन दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजुस नो पार्कींग करण्यात येत आहे.**
- **कमला नेहरू पार्क ते पीवायसी हिंदु जिमखाना रोडवरील दक्षिणेस असलेल्या संजिवन बंगला ते निर्मल बंगला व उत्तरेस असलेल्या दाणी बंगला ते दातार नेत्र क्लिनीक या दरम्यान पी-१ पी-२ पार्कींग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे–४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – 5/11 /२०२३ ते दिनांक – 18/11 /२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,